गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १८४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जनरुग्णहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

### आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थिती: पर्यटकांची घरवापसी सुरू

# तुरुंगात अडकलेल्या भारतीयांच्या नशिबी अद्याप प्रतीक्षाच

**दीपक शेळके**

**जालना -** मध्यपूर्वेतील बदलती राजकीय समीकरणे आणि वाढता तणाव पाहता, आखाती देशांमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. केंद्र सरकारकडून दुबई, अबुधाबी आणि शारजा सारख्या शहरांमध्ये अडकलेल्या पर्यटकांना सुखरूप मायदेशी आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत. अनेक पर्यटक भारतात परतले असले, तरी तिथे कामानिमित्त गेलेल्या कामगारांच्या आणि विशेषतः विविध कारणांमुळे तुरुंगात असलेल्या भारतीयांच्या सुटकेबाबत अद्यापही प्रश्नचिन्ह कायम आहे.

**पर्यटकांची सुटका, मात्र तुरुंगातील भारतीय कामगारांचे काय?**

सध्या सुरू असलेल्या बचाव मोहिमेत प्रामुख्याने फिरण्यासाठी गेलेल्या भारतीयांना प्राधान्य दिले जात आहे. मात्र, आखाती देशांच्या अर्थव्यवस्थेत मोलाचा वाटा उचलणारा भारतीय कामगार वर्ग सध्या चिंतेत आहे. ''आम्हाला कधी परत नेणार?'' असा सवाल अबुधाबी आणि दुबईतील लेबर कॅम्पमध्ये राहणारे कामगार विचारत आहेत. केवळ व्हिसा संपलेलेच नाही, तर नियमित कामावर असलेल्या भारतीयांनाही सध्याच्या अस्थिरतेमुळे मायदेशाची ओढ लागली आहे.

> ''बाहेर युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत आहे, अशा वेळी आमचा माणूस तिथे तुरुंगात असुरक्षित आहे,'' अशी भीती एका पीडित कुटुंबाने व्यक्त केली आहे. या कैद्यांना भारतात आणण्यासाठी प्रत्यार्पण करार किंवा विशेष सवलती अंतर्गत प्रयत्न होणार का? याचे उत्तर अद्याप केंद्र किंवा राज्य सरकारकडून मिळालेले नाही.

**तुरुंगातील भारतीयांची स्थिती: एक गुलदस्त्यातील सत्य**

सर्वात गंभीर परिस्थिती त्या भारतीयांची आहे जे किरकोळ वाद, कायदेशीर तांत्रिक अडचणी किंवा अन्य कारणांमुळे दुबई आणि अबुधाबीतील तुरुंगात किंवा पोलीस कोठडीत कैद आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, परदेशात भारतीयांच्या रक्षणासाठी असलेल्या भारतीय दूतावासाचा तुरुंगात असलेल्या नागरिकांशी संपर्क होऊ शकत नसल्याचे समोर आले आहे.

''बाहेर युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत आहे, अशा वेळी आमचा माणूस तिथे तुरुंगात असुरक्षित आहे,'' अशी भीती एका पीडित कुटुंबाने व्यक्त केली आहे. या कैद्यांना भारतात आणण्यासाठी प्रत्यार्पण करार किंवा विशेष सवलती अंतर्गत प्रयत्न होणार का? याचे उत्तर अद्याप केंद्र किंवा राज्य सरकारकडून मिळालेले नाही.

**सरकारच्या भूमिकेकडे लक्ष**

परराष्ट्र मंत्रालय आणि गृह विभाग सध्या केवळ पर्यटकांच्या आकड्यांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे चित्र आहे. मात्र, आखाती देशांतील तुरुंगात असलेल्या भारतीयांच्या मानवी हक्कांचा आणि त्यांच्या जिवाचा विचार करून सरकारने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी जोर धरत आहे.




''राज्य आणि केंद्र सरकारने केवळ पर्यटकांचा विचार न करता, तिथे वर्षानुवर्षे राबणाऱ्या कामगारांचा आणि दुर्दैवाने तुरुंगात अडकलेल्या आमच्या मुलांचाही विचार करावा. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी त्यांना विशेष विमानाने भारतात आणावे,'' अशी भावनिक मागणी एका नातेवाईकाने केली आहे.

तुरुंगात असलेल्या भारतीयांची यादी तयार करून भारत सरकारकडे ती यादी पोहचविण्याची जबाबदारी तेथील भारतीय दुतावासाची आहे.

युद्धजन्य स्थिती पाहता विमानसेवा विस्कळीत होण्यापूर्वी जास्तीत जास्त नागरिकांना बाहेर काढणे. आखाती देशांच्या प्रशासनाशी बोलून कैद्यांच्या सुटकेसाठी विशेष प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. आता या गंभीर विषयावर परराष्ट्र मंत्रालय आणि केंद्र सरकार सह राज्य सरकार काय ठोस पावले उचलते, याकडे संपूर्ण देशाचे आणि विशेषतः अडकलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांचे डोळे लागले आहेत.

---

### जालना मनपा स्वीकृत सदस्य निवड

# राजकीय भूकंप!; भाजपाचे दोन अपात्र

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या स्वीकृत सदस्य निवडीच्या प्रक्रियेत भारतीय जनता पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. भाजपातर्फे दाखल करण्यात आलेल्या चार अर्जांपैकी दोन उमेदवारांचे अर्ज छाननीमध्ये अपात्र ठरवण्यात आले असून, या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

**छाननी प्रक्रिया आणि निर्णय:**

जालना महानगरपालिकेच्या महापौर तथा पीठासीन अधिकारी श्रीमती वंदना मगरे यांच्या अध्यक्षतेखाली आज अर्जांची छाननी प्रक्रिया पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी तथा मनपा आयुक्त श्रीमती आशिमा मित्तल यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशासकीय निकष आणि कागदपत्रांच्या तांत्रिक तपासणीनंतर आयुक्तांनी भाजपाचे उमेदवार सौ. शोभा नारियलवाले आणि आनंद झारखंडे यांचे अर्ज बाद ठरवले आहेत. हे दोन्ही अर्ज भारतीय जनता पक्षाकडून दाखल करण्यात आलेले होते. त्याच बरोबर भाजपाकडून सिद्धीविनायक मुळे, अर्जुन गेही, शिवसेनेकडून आश्विन भास्कर अंबेकर, तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून विनोद रत्नपारखे यांच अर्ज छाननी अंती पात्र ठरले आहेत.

**राजकीय पेच निर्माण होण्याची शक्यता:**

भाजपाने या पदासाठी एकूण चार उमेदवारांचे अर्ज दाखल केले होते. मात्र, निम्म्या उमेदवारांचे अर्ज बाद झाल्यामुळे आता पक्षातर्फे पुढील पाऊल काय उचलले जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तांत्रिक त्रुटी किंवा अनुभवाचे निकष यामुळे हे अर्ज बाद झाल्याची प्राथमिक चर्चा असून, यामुळे महानगरपालिकेतील सत्ताधारी आणि विरोधी गटांमधील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत.

निवड प्रक्रियेच्या या नाट्यमय घडामोडींमुळे शहरात विविध चर्चांना उधाण आले असून, प्रशासकीय निर्णयावर भाजपाकडून काय प्रतिक्रिया येते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

---

युवा आदर्श

## सुटका ...

लढाईमध्ये आपले
निरपराधी अडकले
पाहता पाहता कसे
महायुद्ध भडकले
मुश्कीलीने त्यातले
मायदेशात परतले
सर्व पक्षीय पुढारी
सु स्वागतात गुंतले
हातात झळके झेंडे
जोर जोरां आपापले
श्रेय एकटे घ्यायला
सगळेजण हपापले
सेल्फी फोटो घेण्यां
पुढारी सगळे रंगले
छापून आणा न्यूज
प्रसिद्धीसाठी दंगले
आम्ही केली सुटका
सर्वत्र सांगत सुटले
पुण्य कर्म हे एकाचे
श्रेय दुस-यांने लाटले
तिकडे लढाई शांत
युध्द इकडेचं पेटले
कोणसगे कोण दुजे
हृदया काहूर दाटले
मदती असंख्य हात
असूनि कोण कुठले
कृतज्ञता शब्द मधूर
मनामनात रे साठले

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

# जिपकडून कामांच्या चौकशीचे आदेश

### जिल्हा परिदषदेत पत्रकारास झालेली धक्काबुकी व जीवे मारण्याची धमकी प्रकरण

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात श्री बांगड नावाच्या गुत्तेदार असलेल्या भावाने चक्क कार्यालयात शिरुन पत्रकाराला धक्काबुक्की आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता या प्रकरणात आता जिल्हा परिषद प्रशासनाने श्री बांगड यांच्या चौकशीचे आदेश दिले आहे. मात्र, कामाची माहिती पत्रकार घेत असल्याचे श्री बांगड या गुत्तेदारास कोणत्या कर्मचारी- अधिकाऱ्याने कळविले याबाबत मात्र, जि.प. प्रशासनाने अद्याप पाऊले उचलली नसल्याने आश्र्यर्य व्यक्त होत आहे.

यासंदर्भात अधिक महिती अशी की, एका गुत्तेदाराने चक्क कार्यालयात शिरून पत्रकाराला धक्काबुक्की आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. या घटनेमुळे जिल्हा परिषद वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. प्रशासकीय सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. जनश्वासचे संपादक भरत गणपतराव मानकर हे एका बातमीच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागातील सहाय्यक लेखाधिकारी श्री. हारुण यांच्या केबिनमध्ये बसले होते. यावेळी श्री. बांगड नावाचा गुत्तेदार तेथे आला. त्याने कोणत्याही कारणाशिवाय मानकर यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. इतक्यावरच न थांबता, या गुत्तेदाराने त्यांना धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिली. विशेष म्हणजे, शासकीय कार्यालयात अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही गुंडागर्दी सुरू असताना उपस्थित कर्मचारी केवळ हतबल प्रेक्षक बनून पाहत होते. संबंधित गुत्तेदाराने केलेल्या सर्व कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप तक्रारदार मानकर यांनी केला आहे. आपल्या भ्रष्टाचाराची पोलखोल होईल या भीतीनेच बांगड याने पत्रकारावर हल्ला केल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे.

या घटनेचे गांभीर्य ओळखून कार्यकारी अभियंता (बांधकाम) सविता सलगर यांनी कडक पावले उचलली आहेत. त्यांनी उप अभियंता (भोकरदन/जाफ्राबाद) यांना आदेश देऊन संबंधित गुत्तेदाराच्या कामाची प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, या प्रकरणाचा चौकशी अहवाल पुढील ८ दिवसांत सादर करण्याचे बजावले असून, विलंब झाल्यास अधिकाऱ्यांनाच जबाबदार धरले जाईल, असा इशारा दिला आहे.

''माझ्या जीवाला या गुत्तेदारापासून मोठा धोका आहे. शासकीय कार्यालयातच जर पत्रकार सुरक्षित नसतील, तर सामान्य जनतेचे काय?''असा प्रश्न भरत मानकर, संपादक, जन श्वास (तक्रारदार) यांनी उपस्थित केला आहे.

आता जिल्हा परिषद प्रशासन या मुजोर गुत्तेदारावर काय कारवाई करते आणि त्याच्या बोगस कामांची चौकशी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून पत्रकार माहिती घेत असल्याचे त्या गुत्तेदारास बांधकाम विभागातील कोणत्या अधिकारी -कर्मचाऱ्याने माहिती दिली हे अद्याप गुलदस्त्यात आहे. यावर जिल्हा परिषद प्रशासन नेमकी काय भुमिका घेते हे येत्या काही दिवसात स्पष्ट होईल.

**पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल; कारवाई थंड बस्त्यात**

पत्रकार भरत मानकर यांना झालेल्या धक्काबुक्की व जीवे मारण्याच्या धमकी प्रकरणात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी कारवाई थंड बस्त्यात असल्याचे चित्र आहे. या घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्याकडे आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तातडीने श्री कुलकर्णी यांनी घटनेदरम्यान उपस्थित असलेल्यांचे जवाब नोंदविले होते. मात्र, त्यानंतर अद्यापपर्यंत तपास हा थंड बस्त्यात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे मत पत्रकार भरत मानकर यांनी व्यक्त केले आहे.

---

# वास्तव परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हेल्मेट सक्ती नको - धनसिंह सूर्यवंशी

**जालना । प्रतिनिधी -** शहरात हेल्मेट सक्तीचा मुद्दा समोर आला असून, अपघात टाळण्यासाठी हेल्मेट महत्त्वाचे आहे, परंतु जालना शहरातील वास्तव परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. रस्ते खड्डेमय, अरुंद आणि विस्कळीत आहेत. अशा परिस्थितीत अपघातांचे मूळ कारण हेल्मेट नसून निकृष्ट रस्ते आणि वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी आहेत, असे स्पष्ट मत सामाजिक कार्यकर्ते तथा आंदोलक धनसिंह सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

हेल्मेट सक्तीला तीव्र विरोध दर्शवत ते म्हणाले, की हेल्मेटमुळे वाहन चालवताना आजूबाजूचा आवाज कमी ऐकू येतो, विशेषतः गजबजलेल्या बाजारपेठा आणि छोटे रस्ते असलेल्या भागांत धोका वाढू शकतो. दिवसभर शहरात छोट्या-छोट्या अंतरांसाठी हेल्मेट बाळगणेही त्रासदायक ठरते. त्यामुळे ''हायवेवर सक्ती असावी, पण शहरात प्रबोधन व्हावे, असे ते म्हणाले. बेभान वेगाने वाहन चालवणारे, सायलेंसरमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाज करणारे, हॉर्नचा अतिरेक करणारे यांच्यावर कठोर कारवाई क्वचितच दिसते. अपघातांचे प्रमाण वाढवणाऱ्या या घटकांकडे दुर्लक्ष करून फक्त हेल्मेटधारकांवर दंडाची मोहिम राबवली जाते, अशी टीका त्यांनी केली. दंडासाठी अचानक पोलीस उपलब्ध होतात, पण तक्रारींसाठी पोलीस ठाण्यात मनुष्यबळ कमी असल्याचे सांगितले जाते, असेही ते म्हणाले. प्रशासनाने सक्तीपेक्षा संवाद आणि प्रबोधनाचा मार्ग स्वीकारावा. शाळामहाविद्यालयांत जनजागृती, अपघातग्रस्तांच्या अनुभवांवर आधारित कार्यक्रम, आणि नागरिकांसोबत खुली चर्चा यामुळे सुरक्षिततेबाबत सकारात्मक वातावरण तयार होऊ शकते. नियम लादण्यापेक्षा त्यामागील कारण समजावून सांगणे अधिक परिणामकारक ठरते, असे सांगून सूर्यवंशी म्हणाले, की जालना शहर महानगरपालिका हद्दीबाहेरील राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांवर हेल्मेट सक्ती कडकपणे अंमलात आणावी. कारण तिथे वेग जास्त असतो आणि अपघातांचा धोका गंभीर असतो. मात्र शहरातील अरुंद रस्त्यांवर, निकृष्ट पायाभूत सुविधांमध्ये केवळ दंडवसुलीचा आभास निर्माण होऊ नये, असे मत त्यांनी व्यक्त केले. आमच्या सुरक्षेसाठी खड्डेमुक्त रस्ते, शिस्तबद्ध वाहतूक आणि कठोर अंमलबजावणी हवी केवळ हेल्मेट सक्ती नव्हे. सुरक्षिततेचा खरा मार्ग सक्तीपेक्षा सहभागातूनच जातो, असेही ते म्हणाले.



---

### जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आवाहन

# बचत ही काळाची गरज असून वेतनातील २० टक्के रक्कमेची गुंतवणूक करा

**जालना । प्रतिनिधी -** भविष्यातील आर्थिक स्थैर्य आणि सुरक्षिततेसाठी बचत करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने आपल्या एकूण वेतनातील किमान २० टक्के रक्कम विविध योजनांमध्ये गुंतवून आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात सायंकाळी ५ वाजता भारतीय डाक विभागाच्या डाक जीवन विमा व इतर विविध बचत योजनोविषयक, म्युचुअल फंड तसेच सायबर सुरक्षेवर सविस्तर मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, डाक जीवन विमा विकास अधिकारी संदीप महाजन यांच्यासह एचडीएफसी म्युचुअल फंडचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, बदलत्या काळानुसार आर्थिक नियोजन करणे आवश्यक आहे. केवळ पैसे कमावणे पुरेसे नसून, त्याचे योग्य नियोजन आणि गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहे. सरकारी योजनांमध्ये गुंतवणूक केल्यास सुरक्षिततेसोबतच चांगला परतावा मिळतो, ज्याचा फायदा कुटुंबाला संकटकाळात किंवा निवृत्तीनंतर होऊ शकतो. तसेच ज्या गोष्टीत आपल्याला धोका पत्करावा लागतो तिथे आपल्याला मोबदलाही जास्त पटीने मिळत असतो. असेही त्यांनी यावेळी सांगितले. डाक जीवन विमा पान २ वर

# संपादकीय पान

## भारतीय क्रिकेटसाठीही नवी दिशा देणारी

भारतीय क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठेची आणि सर्वात मोठी समजली जाणारी देशांतर्गत क्रिकेट स्पर्धा म्हणजे रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा. दरवर्षी ही स्पर्धा जिंकण्यासाठी देशातील सर्व राज्यातील खेळाडू जीवाचे रान करतात. आजवर या स्पर्धेत मुंबई, कर्नाटक, दिल्ली, कोलकाता, चेन्नई, सौराष्ट्र या संघाचे वर्चस्व राहिले आहे. मुंबईने तर सर्वाधिक वेळा ही स्पर्धा जिंकून या स्पर्धेवर आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे त्यामुळे यावर्षीही मुंबईच ही स्पर्धा जिंकेल असा कयास बांधला जात होता. मुंबईचे खेळाडूही फॉर्मात होते पण उपउपान्त्य फेरीत कर्नाटकने मुंबईला अनपेक्षित धक्का देत मुंबईला स्पर्धेबाहेर ढकलले. मुंबई विजेपदाच्या शर्यतीतून बाहेर पडल्यावर कर्नाटकच ही स्पर्धा जिंकेल असे वाटत होते. कर्नाटकनेही त्या दृष्टीने दमदार पाऊल टाकत अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम फेरीत त्यांच्यासमोर होता तो जम्मू काश्मीर सारखा दुबळा संघ. जम्मू काश्मीर हा या स्पर्धेतील सर्वात दुबळा संघ समजला जात होता. त्यांच्या संघात एकही आंतरराष्ट्रीय खेळाडू नसल्याने त्यांच्या संघाला ग्लॅमरही नव्हते शिवाय हा संघ पहिल्यांदाच रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत पोहचल्याने त्यांना विजेतेपदासाठी कोणीही पसंती दिली नाही. कर्नाटक हा संघ जम्मू काश्मीरपेक्षा कैक पटीने बलवान होता त्यामुळे कर्नाटकच ही स्पर्धा जिंकेल असा कयास बांधला जात असताना जम्मू काश्मीरने भारतीय क्रिकेट जगताला आश्चर्याचा धक्का दिला आणि कर्नाटकला धोबीपछाड देत रणजी करंडकावर आपल नाव कोरत इतिहास घडवला आणि भारतीय क्रिकेट जगताला आश्चर्याचा धक्का दिला. रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत जम्मू काश्मीरने पहिल्यांदा फलंदाजी करत ५८४ धावांचा डोंगर उभारला. या धावा काढताना जम्मू काश्मिरच्या फलंदाजांनी मोठ्या भागीदारीवर भर दिला. त्यांच्या फलंदाजांनी संयमी फलंदाजी केली. त्यांच्या गोलंदाजांनीही अप्रतीम गोलंदाजी करत कर्नाटकला पहिल्या डावात २९३ धावात रोखले. पहिल्या डावात मोठी आघाडी घेतल्याने जम्मू काश्मीर हा रणजी करंडकाचा नवा विजेता असेल हे स्पष्ट झाले आणि झालेही तसेच जम्मू काश्मीर संघ रणजी करंडकाचा नवा विजेता ठरला आणि इतिहास घडला. अर्थात हा इतिहास एका रात्रीत घडला असे नाही तर त्यासाठी या संघाने गेल्या अनेक महिन्यांपासून तयारी केली होती. ही स्पर्धा जिंकण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. संपूर्ण स्पर्धेत हा संघ एका कुटुंबाप्रमाणे खेळताना दिसला. त्यांचा कर्णधार पारस डोगराने संपूर्ण संघाला एकसंध ठेवताना आघाडीवर राहून संघाचे नेतृत्व केले. त्याने या स्पर्धेत सर्वाधिक धावा काढल्या आणि आपल्या संघाला विजेतेपद मिळवून दिले. संपूर्ण स्पर्धेत त्याने आपल्या नेतृत्व गुणांची चमक दाखवली. त्यांचा गोलंदाज अकिब नबी दर हा तर या स्पर्धेचा हिरो ठरला. संपूर्ण स्पर्धेत अप्रतिम गोलंदाजी करून त्याने प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणले. निर्णायक सामन्यात त्याने मोक्याच्या वेळी बळी मिळवून आपल्या संघावरील दबाव कमी करत प्रतिस्पर्धी संघावर दबाव आणला. अंतिम सामन्यात तोच सामनावीर ठरला. जम्मू काश्मीर संघाचा हा विजय ऐतिहासिक असाच आहे. जम्मू काश्मीर संघाचा हा विजय केवळ क्रीडा कामगिरी नाही तर संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणादाई कहानी आहे. भौगोलिक, सामाजिक आणि पायाभूत अडचणींवर मात करत जम्मू काश्मिरच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपली ताकद सिद्ध केली. या विजयाने त्यांनी सिद्ध केले की प्रतिभा केवळ मोठ्या शहरातच असते नाही तर छोट्या शहरात अगदी ग्रामीण भागातही प्रतिभा दडली असते. फक्त या प्रतिभेला योग्यवेळी संधी मिळणे गरजेचे आहे. ही संधी मिळण्यास या भागातील खेळाडूही देशाला अभिमान वाटेल अशी दैदिप्यमान कामगिरी करू शकतात. जम्मू काश्मिरची ही कामगिरी अन्य छोट्या पण दुर्लक्षित संघासाठी प्रेरणादाई तर आहेच पण भारतीय क्रिकेटसाठीही नवी दिशा देणारी आहे. रणजी करंडक जिंकून इतिहास घडवणाऱ्या जम्मू काश्मीर संघाचे मनापासून अभिनंदन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

जलप्रदूषण आणि अपप्रकार रोखणारे खडकवासला जलाशय रक्षण अभियानाची यशस्वी द्वितपपूर्ती!

# खडकवासला जलाशय रक्षण मोहीम: पर्यावरण संवर्धनाचा एक प्रेरणादायी दीपस्तंभ!

**पुणे । प्रतिनिधी -** हिंदु जनजागृती समिती मागील २३ वर्षापासून खडकवासला जलाशय रक्षण मोहीम राबवत आहे. धरण परिसरात जलाशय रक्षणाची अखंड, अविरत आणि प्रेरणादायी मोहीम खडकवासला ग्रामस्थ तसेच सामाजिक जाणीव असलेल्या पुणेकरांच्या सहभागातून प्रतिवर्षी होत असते. या मोहिमेचे यंदाचे हे २४ वे वर्ष आहे. भारतीय जनता पक्षाचे विद्यमान आमदार श्री भीमराव (आण्णा) तापकीर यांनी नारळ वाढवून मोहिमेचे उद्घाटन केले. धुलीवंदन आणि रंगपंचमी या दोन्ही दिवशी जलाशयाचे पावित्र्य अबाधित राहावे या संकल्पातून हिंदु जनजागृती समितीचे कार्यकर्ते, खडकवासला ग्रामस्थ, स्थानिक प्रशासन यांच्या सहकार्याने जलाशयाभोवती मानवी साखळी करून जलाशयाचे रक्षण करतात. समितीची ही मोहीम प्रतिवर्षी शतप्रतिशत यशस्वी झाली आहे. मोहीम सुरू झाल्यापासून एकाही व्यक्तीने जलाशयात प्रवेश केला नाही. निसर्गरक्षणाचा ध्यास, समाज प्रबोधनाची तळमळ, कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे ही मोहीम पर्यावरण संवर्धनाचा एक दीपस्तंभ ठरली आहे.

पुणे शहर आणि परिसरातून आलेले २०० हून अधिक धर्मप्रेमी प्रबोधनात्मक फलक हातात धरून खडकवासला जलाशयाभोवती मानवी साखळी करून उभे होते. सकाळी ९ ते सायंकाळी ७ पर्यंत ही मोहीम राबवण्यात आली. या अभियानामध्ये स्थानिक ग्रामस्थांसह, पारगाव, दौंड, सासवड, तळेगाव, भोर,शिरवळ मांजरी, पुणे शहर अशा ठिकाणाहून जागरूक नागरिक सहभागी झाले होते.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे, खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार श्री भीमराव (आण्णा) तापकीर, पुणे महानगरपालिकेच्या भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका सौ. धनश्री दत्तात्रय कोल्हे, भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री. दत्तात्रय कोल्हे, भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे माजी अध्यक्ष सारंग नवले, नांदेड सिटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अतुल भोस, हिंदुराष्ट्र समन्वय समितीचे श्री. सचिन घुले, हिंदु जनजागृती समितीचे श्री. पराग गोखले यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.



धरणाच्या पाण्यात कोणी उतरू नये, तसेच पाण्याचे प्रदूषण करू नये यासाठी समिती निःस्वार्थपणे हे कार्य करत आहे. सर्व नागरिकांनी जलस्रोत सुरक्षित राहतील यासाठी प्रयत्नशील राहावे असे आवाहन खडकवासला मतदारसंघाचे भाजप आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी केले.

हिंदु जनजागृती समिती, खडकवासला ग्रामस्थ, पोलीस, प्रशासन,जागरूक नागरिक आणि समविचारी संघटना यांच्या वतीने हे अभियान राबवण्यात आले. प्रबोधनानंतर अनेक नागरिकांनी अभियानाचे विशेष कौतुक केले. पोलीस-प्रशासनाचेही या अभियानाला उत्तम सहकार्य लाभले.

अशाच प्रकारे रंगपंचमीच्या दिवशी म्हणजे ८ मार्चलाही हे अभियान राबवण्यात येणार आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन हिंदु जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# फिरकीचा जादूगार शेन वॉर्न

बरोबर चार वर्षापूर्वी आजच्याच दिवशी ( ४ मार्च २०२२ ) क्रिकेट विश्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादूगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनाची बातमी क्रिकेट रसिक पचवू शकले नाही. अनेकांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्वाला जबर धक्का बसला. शेन वॉर्न जाऊन आज दोन वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले.

१३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी . खेळपट्ट्या वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भाराताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या ऍशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सलो की पळो करून सोडले. आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक ग्याटिंग ऑफ साईडला चेंडू टाकला. ग्याटिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गाटिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे.

शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्ट्या वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्ट्यांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे.

त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १० किंवा १० पेक्षा अधिक बळी त्याने १० वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता.

शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती. मैदानावर हे दोन महान खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकत असले तरी मैदानाबाहेर मात्र हे दोघे एकमेकांचे जिवलग मित्र होते. १९९० ते २०१० असे वीस वर्ष ऑस्ट्रेलियाने क्रिकेट विश्वावर एकहाती हुकूमत गाजवली त्यात शेन वॉर्नचा मोठा वाटा होता.

निवृत्तीनंतर शेन वॉर्नने समालोचन केले. २००८ साली आयपीएलचा पहिले सत्र पार पडले. या पहिल्या सत्रात शेन वॉर्न राजस्थान रॉयल्स या संघाचा कर्णधार होता. विशेष म्हणजे या संघात शेन वॉर्न वगळता एकही स्टार खेळाडू नव्हता. या संघात तरुण आणि नवख्या खेळाडूंचा भरणा होता तरीही शेन वॉर्नने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने आणि नेतृत्व गुणाने राजस्थान रॉयल्स ला विजेतेपद मिळवून दिले.

शेन वॉर्नच्या मृत्यू नंतर क्रिकेट विश्वाची मोठी हानी झाली. त्याच्या सारखा महान फिरकी गोलंदाज पुन्हा होणार नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला चौथ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम



**जालना । प्रतिनिधी -** राजस्थान राज्याचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे शुक्रवार दि.६ मार्च २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

शुक्रवार दि.६ मार्च २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून दुपारी २.५५ वाजता जेईएस महाविद्यालय, जालना येथे आगमन व राखीव. दुपारी ३ ते ४ या वेळेत जालना ज्येष्ठ नागरिक मंचाकडून आयोजित कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ४.३५ वाजता जालना येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

पान १ वरुन

### बचत ही काळाची ...

विकास अधिकारी संदीप महाजन यांनी डाक विभागाच्या योजनांची विश्वासार्हता आणि त्यातील पारदर्शकतेवर प्रकाश टाकला. डाक जीवन विमा, सुकन्या समृद्धी योजना, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी आणि मुदत ठेव योजनांची माहिती देण्यात आली. तसेच गुंतवणुकीचे महत्त्व पटवून देण्यात आले. एचडीएफसी म्युच्युअल फंडाच्या अधिकाऱ्यांनी बाजारपेठेवर आधारित गुंतवणुकीच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. तसेच यावेळी सायबर सुरक्षावरही मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेला विविध विभागातील शासकीय अधिकारी- कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जालन्यात होळीच्या पूर्वसंध्येला रंगली शब्दांची मैफल

# राजकीय, सामाजिक विकृतींवर कवींचे मार्मिक प्रहार

**जालना । प्रतिनिधी -** रंगांचा सण होळी म्हणजे आनंद आणि उत्साहाची उधळण, मात्र यंदा जालन्यात केवळ रंगांचीच नाही, तर शब्दांची आणि हास्याची मोठी मेजवानी जालनेकरांना मिळाली. जालना माहेश्वरी समाज आयोजित आणि आयकॉन स्टील प्रस्तुत राष्ट्रीय पातळीवरील प्रख्यात कवींच्या उपस्थितीत होळीच्या पूर्वसंध्येला १मार्च रोजी ज्वाला लॉन येथे भव्य हास्य व्यंग कवी संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.

हास्य आणि व्यंग्य होळी उत्सव कवींच्या संग या संकल्पनेतून साकारलेल्या या सोहळ्यात देशाच्या विविध कोपऱ्यांतून आलेल्या नामांकित कवींनी आपली कला सादर केली. या मैफिलीत विशेषतः राजकारण आणि समाजातील विविध विकृतींवर कवींनी आपल्या खास शैलीत मार्मिक ओढलेले ताशेरे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले. हास्य, व्यंग आणि शृंगार रसाचा हा त्रिवेणी संगम उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध करणारा ठरला.

या मैफिलीत शुजालपूरचे प्रसिद्ध कवी गोविंद राठी यांनी आपल्या बहारदार सूत्रसंचालनाने संपूर्ण कार्यक्रमात रंगत भरतानाच आपल्या खुमासदार शैलीने हास्याचे फवारे उडवले. छत्तीसगडचे प्रख्यात हास्य कवी हीरामणी वैष्णव (कोरबा) आणि बंशीधर मिश्रा (बिलासपूर) यांनी आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांना पोट धरून हसवले. यवतमाळचे कपिल जैन यांनी आपल्या व्यंग शैलीतून उपस्थितांची मने जिंकली. दिल्लीच्या प्रसिद्ध कवयित्री रजनी श्रीवास्तव यांनी आपल्या शृंगार रसातील कवितांनी रसिकांना मोहिनी घातली, तर नागपूरचे प्रसिद्ध हास्य व्यंगकार सतीश लाखोटिया हास्य रंगाचे फवारे उडविले.

प्रास्ताविकपर भाषणात माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी म्हणाले की, होळीच्या निमित्ताने नागरिकांना रोजच्या धावपळीतून विरंगुळा मिळावा आणि दर्जेदार साहित्याचा आनंद घेता यावा, यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जालन्याला सांस्कृतिक व साहित्य वारसा लाभलेला आहे. त्याचे जतन करण्यासाठी आयकॉन स्टील परिवाराच्या सहकार्याने जालन्यात होणारे हे दुसरे हास्य कवी संमेलन आहे. समाजातील कुरिती जसे प्री वेडिंग, कार्निवल, बेबी शॉवर, बॅचलर पार्टी आदी चालीरीतीबद्दल त्यांनी चिंता व्यक्त करून, या मुद्द्यावर विडंबनात्मक ताशेरे ओढण्याबाबत त्यांनी कवींना विनंती केली.



प्रारंभी सहभागी कवींचे स्वागत जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज, राजेंद्र मंत्री, पुसाराम मुंदडा, शिवरतन मुंदडा, विनोद बियाणी, अरुण लाहोटी, अमोल बांगड, श्याम लखोटिया, सुनील बियाणी, अमोल बांगड, डॉ. आशुतोष सोनी, रामेश्वर राठी,

महेश सारडा, रामनिवास मुंदडा, शैलेश मुंदडा यांनी केले तर प्रायोजक आयकॉन स्टील परिवाराचे कांतीलाल राठी, दिनेश राठी, संजय राठी यांचे स्वागत सत्यनारायण सारडा, दामोदर बजाज, शिवप्रसाद गट्टानी यांनी केले. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. स्वप्निल सारडा यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार उमेश बजाज यांनी मानले.

कवी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मार्गदर्शक ओमप्रकाश मंत्री, विजय राठी, संजय दाड, कांतीलाल राठी, रामनिवास मानधना, कैलाश लोया तसेच जालना माहेश्वरी समाज कार्यकारणीसह माहेश्वरी समाजाच्या १७ प्रभागांचे पदाधिकारी, युवा संघटन, महिला संघटनाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला जालन्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दाद दिली, ज्यामुळे यंदाची होळी खऱ्या अर्थाने हास्यरंगी ठरली.

मुक्त विद्यापीठाचा रोजगाराभिमुख उपक्रम

# बांबू सामुदायिक विकास केंद्राची स्थापना होणार

## पेठ तालुक्यातील बांबू उद्योगाला मिळणार नवी उभारी



**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या पेठ तालुक्यातील घनशेत गावाची ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने बांबू कारागिरांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. दुर्गम आदिवासी भागातील बांबू कारागिरांना तांत्रिक कौशल्य, उपजीविकेचे साधन व्यासपीठ आणि जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक पाउल म्हणून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यास पेठ, दिंडोरी, सुरगणा आणि त्र्यंबकेश्वर या तालुक्यांमधून ७० बांबू कारागीर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन उपस्थित होते. नाशिक जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक श्री. ए. आर. साखरे, पेठ वनविभागाचे प्रादेशिक अधिकारी श्री. अमित साळवे, सक्सेस ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. नितीन सोनवणे, घनशेतच्या सरपंच श्रीमती शांता चौधरी, गावंधचे सरपंच श्री. धनराज ठाकरे, कुळवंडीच्या सरपंच श्रीमती सुनंदा सहारे आणि आमलोनच्या सरपंच श्रीमती वनिता भोये यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे म्हणाले की बांबू कारागिरांच्या हाताला काम आणि त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी मुक्त विद्यापीठ कटिबद्ध आहे. कौशल्यावर आधारित शिक्षणातूनच ग्रामीण विकास शक्य असून ज्ञानगंगा घरोघरी या ब्रीदवाक्याप्रमाणे ‘रोजगार आपल्या दारी’ पोहोचवण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. येथे जिल्हा उद्योग केंद्राच्या सहकार्याने स्थानिकांना हक्काचा रोजगार मिळवून देवून बांबू उद्योगाला मोठी चालना दिली जाणार असल्याचेही ते म्हणाले. प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी पारंपरिक कलेला आधुनिकतेची जोड मिळाल्यास आदिवासी युवकांचे जीवनमान उंचावेल असा विश्वास व्यक्त केला. जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक श्री. ए. आर. साखरे यांनी बांबू व्यवसायासाठी उपलब्ध असणाऱ्या शासकीय योजना, कर्ज सुविधा आणि सबसिडी याबद्दल सविस्तर माहिती दिली. वनविभागाचे प्रादेशिक अधिकारी श्री. अमित साळवे यांनी बांबू लागवड, वनविभागाचे नियम आणि कच्च्या मालाच्या उपलब्धतेवर प्रकाश टाकला, तर सक्सेस ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. नितीन सोनवणे यांनी बांबू उत्पादनांचे ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि जागतिक बाजारपेठेतील मागणी यावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विद्यापिठाच्या ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेचे संचालक प्रा. कैलास मोरे यांनी केले. त्यात त्यांनी या उपक्रमांतर्गत घनशेत ग्रामपंचायतीने सामूहिक वनहक्क दाव्यातील दोन एकर जागा बांबू सामुदायिक विकास केंद्रासाठी विद्यापीठाला उपलब्ध करून दिली असून त्यावर विविध प्रजातींच्या बांबूची लागवड केली जाणार असल्याचे सांगितले.

यानिमित्ताने पारंपरिक टोपल्या आणि सुपांच्या पलीकडे जाऊन कारागिरांनी बनवलेल्या बांबूच्या शोभेच्या वस्तू आणि फर्निचरचे प्रदर्शनही यावेळी भरवण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. माधव टोपले यांनी केले तर आभार डॉ. दीपक सोनवणे यांनी मानले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत अधिकारी श्री. नंदू गायकवाड, श्री. विनायक महाले, श्री. रवींद्र चौधरी, श्री. कैलास चौधरी, श्री. जनार्दन भोये तसेच श्री. गोकुळ टोंगारे आणि गणेश उमाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रत्येक गावातील नागरिकांच्या प्रलंबित समस्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराच्या माध्यमातून सोडविणार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

## जिल्ह्यात ६५ ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरांचे आयोजन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत ‘‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान‘‘ टप्पा १ आयोजित करण्यात येणार आहे. या कालावधीत आयोजित शिबीरादरम्यान प्रत्येक गावातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनातील सर्व यंत्रणांनी प्रयत्न करावेत असे निर्देश छत्रपती संभाजी नगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

आज दि. 0४ मार्च २०२६ रोजी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर विभाग जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली जालना जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसंरपंच यांची छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराबाबत आयोजित दुरभाष्य परिषदेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

या दुरभाष्य परिषदेस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना शिरीष बनसोडे, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, सर्व उप विभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत, सर्व गटविकास अधिकारी यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलतांना विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर म्हणाले की, प्रत्येक गावातील नागरिकांच्या महसूल व इतर शासकीय योजनांशी संबंधित प्रलंबित समस्या या शिबिरांच्या माध्यमातून तात्काळ सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी संबंधित गावातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्या, अडचणी, तक्रारी ह्या मंडळ अधिकारी यांच्याकडे देणे बंधनकारक राहील. संबंधित मंडळात ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरांचे आयोजन केले जाणार आहे त्या दिवशी संबंधित विभागाचे अधिकारी या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. तसेच या शिबीरा दरम्यान महाराष्ट्र शासनाकडून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी व शासकीय योजना सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच लोकाभिमुख प्रशासनासाठी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय व योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात यावी.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले की, जालना जिल्ह्यात एकूण ६५ ठिकाणी ‘‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर’’ आयोजित करण्यात येणार असून मंडळ स्तरावर या शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक शिबिरात महसूल, ग्रामविकास, पंचायत राज, सामाजिक न्याय, कृषी, आरोग्य आदी विभागांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या अर्जांची तत्काळ दखल घेतील.

७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत मंडळ व नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर राबविण्यात येणार असून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांचे महसूल विषयक प्रश्न तात्काळ निकाली काढणे हा प्रमुख उद्देश आहे. प्रत्येक तालुक्यात एकदिवसीय समाधान शिबिरे आयोजित करून प्रलंबित फेरफार, ७/१२ दुरुस्ती, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रे यांसारख्या सेवा ‘सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी’ तत्त्वावर देण्यात याव्यात, असे त्यांनी निर्देशित केले.

अभियानाच्या पूर्वतयारीत गावनिहाय प्रलंबित प्रकरणांची यादी तयार करून शिबिरापूर्वी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करावी. ७/१२ व ८अ उताऱ्यांचे अद्ययावतीकरण, डिजिटल ७/१२ ची जनजागृती, तसेच एकवेळच्या अधिमूल्य भरणा पद्धतीबाबत नागरिकांना मार्गदर्शन करावे. तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणे, संपादन व अकृषी परवानगी नोंदींची अद्ययावत माहिती शिबिरात उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी सांगितले. तसेच ‘एक खिडकी व्यवस्था’ प्रभावीपणे राबवून सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहतील याची दक्षता घ्यावी. शिबिरांची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे व दवंडीचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले.

जिल्हातील शिबीरांचे ठिकाण व दिनांक :- ७ मार्च २०२६ जालना- देवमूर्ती, बदनापूर- बावणे पांगरी, अंबड-जामखेड, घनसावंगी-कुंभार पिंपळगाव, परतुर- आष्टी, मंठा- पांगरी गोसावी,भोकरदन- राजुर, जाफ्राबाद- माहोरा

१४ मार्च २०२६- जालना- नेर, बदनापूर- रोषणगाव, अंबड-धनगर प्रिंप्री, घनसावंगी-राणी उंचेगाव, परतुर- श्रीष्टी, मंठा-तळणी, भोकरदन- जानेफळ दाभाडी, जाफ्राबाद-कोळेगाव

२२ मार्च २०२६-जालना- सावंगी तलाव, अंबड- शहागड, घनसावंगी- रांजणी, भोकरदन- धावडा.२८ मार्च २०२६-जालना-विरेगाव, बदनापूर- शेलगाव, अंबड- वडीगोद्री, भोकरदन- आव्हाना.

६ एप्रिल २०२६- जालना- रामनगर, भोकरदन- पिंपळगाव रेणुकाई

१० एप्रिल २०२६-जालना- वाघ्रुळ जहागीर, बदनापूर- चिखली, अंबड-ताड हदगाव, घनसावंगी-पानेवाडी, परतुर- वाटुर, मंठा-ढोकसाळ, भोकरदन- केदारखेडा, जाफ्राबाद- टेंभुर्णी

१७ एप्रिल २०२६- जालना- पाचन वडगाव, बदनापूर- दाभाडी, अंबड- गोंदी, घनसावंगी-अंतरवाली टेंभी, परतुर- सातोना खुर्द, मंठा- माळतोंडी, भोकरदन- हसनाबाद, जाफ्राबाद- वरुड बुद्रुक.

२४ एप्रिल २०२६-जालना-सेवली, बदनापूर- ग्रामीण, अंबड-सुखापुरी, घनसावंगी-जांब समर्थ, परतुर- परतुर ग्रामीण, मंठा- जयपूर, भोकरदन- दानापूर, जाफ्राबाद- कुंभारझरी.

२ मे २०२६- जालना- गोलापांगरी, अंबड- रोहिलागड, परतुर-कोकाटे हदगाव, मंठा- मंठा शहर, भोकरदन- सिपोरा बाजार.

८ मे २०२६- जालना मनपा, बदनापूर नगर पंचायत, नगर परिषद अंबड, नगर पंचायत तिर्थपुरी, नगर परिषद परतुर, नगर पंचायत मंठा, नगर परिषद भोकरदन, नगर पंचायत जाफ्राबाद.

१५ मे २०२६ नगर पंचायत घनसावंगी, भोकरदन- आन्वा

जिल्हातील सर्व नागरिकांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

# धुलिवंदन हत्ती रिसाला उत्सव समितीची मिरवणुक उत्साहात साजरी

**जालना -** येथील धुलिवंदन हत्ती रिसाला उत्सव समिती ची १३७ वर्षे असलेली परंपरागत मिरवणुक मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी प्रमुख पाहुणे श्री अजयकुमार बंसल यांचे स्वागत समितीचे अध्यक्ष अंकुश राऊत यांनी केले तर पोलीस अप्पर पोलिस अधीक्षक श्री आयुष नोपाणी यांचे स्वागत कार्याध्यक्ष सुभाष देविदान यांनी तर उपविभागीय पोलीस अधिकारी अनंतजी कुलकर्णी यांचे स्वागत सरचिटणीस रमेशभैय्या गौरक्षक यांनी तसेच सदर बाजार पोलीस स्टेशन चे निरीक्षक संदीप भारती यांचे स्वागत उपाध्यक्ष ओमप्रकाश भारूका यांनी केले.

प्रास्ताविक समिती अध्यक्ष अंकुश राऊत यांनी होली धुलिवंदन निमित्त जुना काळाची आठवण करून देत समितीचे कार्याबद्दल माहिती दिली. आभार प्रदर्शन चिटणीस हिरालाल पिपरीये यांनी केली. यानंतर रिसाला समितीचे राजाचे स्वागत पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल यांनी तर अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी प्रधान यांचे तर. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी भारतमातेचे पुष्पहार टाकून केले.

यानंतर प्रमुख पाहुण्याचे हस्ते रिसाला समितीच्या हत्तीचे पुष्पहार टाकून स्वागत करून मिरवणुकीची सुरूवात करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे ओम भारूका, हिरालाल पिपरीये, मुन्ना गजबी, नगरसेवक रमेश गौरक्षक, दिगंबर दुर्गेश कठोठीवाले, रोहित भुरेवाल, बजरंगसिंह राजपुत, इंदर भैय्या गौरक्षक, राधेश्याम विजयसेनानी, गोविंद गाजरे, सुर्यकांत पवार, ओमप्रकाश भिसे, सतिष जाधव, शरद गादिया, अनराज धोका, रविंद्र खर्डेकर, रामराव मगर, रमेश राऊत, मच्छिंद्र शिंदे, रमेश कवडे, रमेश अप्पा कोठाडे, सतिष संचेती, प्रकाश जगताप, रामदास पवार, बबन आजगे, सुनिल वाघमारे, चंद्रकांत गाजरे, सुभाष गायकवाड, बाळु देशमुख, डॉ. राधेशाम जैस्वाल, डॉ. जनार्धन शहाणे, जावेद तांबोळी, मोहन शिंदे, सिंधनकर सर, राजु कंठाळे, संतोष गाजरे, पुरूषोत्तम गुंजमुर्ते, राजु वाघमारे, गोविंद जाधव आदी उपस्थित होते.




# क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात सामूहिक योगदानाची गरज-प्रा.सोपानराव तेलगड

## जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; ६० खेळाडूंचा सहभाग

**जालना । प्रतिनिधी -** क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्राला कोणत्याही सरकारी अनुदानाशिवाय चालवणे कठीण असते. अशा परिस्थितीत आयोजक करत असलेले कष्ट कौतुकास्पद आहेत. जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू. सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील प्रगतीसाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे योगदान देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते आणि क्रीडा मार्गदर्शक प्रा. डॉ. सोपानराव तेलगड यांनी येथे बोलताना केले.

मराठा क्रांती मोर्चा प्रणित शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने रविवार दि. १ मार्च रोजी जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित शिवकालीन शस्त्र प्रदर्शन तथा जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेचे उद्घाटन प्रा. सोपानराव तेलगड यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. स्पर्धेत जिल्हाभरातून ६० ते ६५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यातील विजयी खेळाडूंची पुढील आठवड्यात होणाऱ्या राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत निवड करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तायक्कांदो असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद देशमुख हे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. सौ. अमृता कुलकर्णी ह्या होत्या तर व्यासपीठावर शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष विश्वंभर तिरुखे, नियोजक किशोर मरकड, निमंत्रक अशोक पडूळ, मंगेश मोरे, संघटनेचे महासचिव सचिन आर्य, आयोजक मयूर पिवळ, पंच पवन झोल, ज्ञानेश्वर मोरे, आदित्य चव्हाण, भागवत गाडे, नीरज वानखेडे आदींची उपस्थिती होती.

प्रा. तेलगड पुढे म्हणाले की, जालन्यातील क्रीडा कौशल्याला वाव देण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन होणे ही अभिमानाची बाब आहे.



तायक्कांदो हा खेळ केवळ शरीर मजबूत करण्यासाठी नाही, तर मुलींसाठी स्वसंरक्षणाचे एक प्रभावी माध्यम आहे. संकटाच्या काळात स्वतःचे रक्षण स्वतः करण्याची ताकद या खेळातून निर्माण होते. जालना जिल्हा क्रीडा क्षेत्रात काहीसा मागासलेला समजला जात असला, तरी इथल्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपली मोहोर उमटवली आहे. प्रशासकीय आणि राजकीय पातळीवरून अधिक पाठबळ मिळाल्यास आपले खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्कीच झळकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात अरविंद देशमुख म्हणाले की, तायक्कांदो हा खेळ आता पोलीस भरतीपासून ते वैद्यकीय क्षेत्रातील आरक्षणापर्यंत महत्त्वाचा ठरत आहे. ही एक शिस्तबद्ध युद्धकला असून मुला-मुलींच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी ती आवश्यक आहे. जालन्यातील अनेक खेळाडूंनी याआधीही राष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे. या निवड चाचणीतून निवडले जाणारे खेळाडू राज्य आणि देश पातळीवर जालन्याचा झेंडा फडकवतील, असा मला ठाम विश्वास आहे. डॉ. अमृता कुलकर्णीसारख्या तज्ज्ञांच्या सहभागामुळे खेळाडूंच्या आहार आणि आरोग्याचा प्रश्नही सुटण्यास मदत होईल. तायक्कांदो हा खेळ ऑलिंपिकशी संलग्न आहे. प्रा. तेलगड यांनी या खेळाला अधिक व्यापक करण्यासाठी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून बैठक ठेवली होती. मात्र, अजित पवार यांचे दुर्दैवी निधन झाले. आता उपमुख्यमंत्री बनलेल्या सुमित्राताई पवार यांच्या माध्यमातून प्रा. तेलगड हे तायक्कांदो खेळासाठी निश्चितच योगदान देतील, असा विश्वास अरविंद देशमुख यांनी व्यक्त केला. डॉ. अमृता कुलकर्णी म्हणाल्या की, मी वयाच्या ४० व्या वर्षी देखील तायक्कांदोची विद्यार्थिनी असून, डायट आणि न्यूट्रिशनबाबत कुणाला काही शंका असतील तर त्याचे निरसन केव्हाही करण्यास तयार आहे. स्पर्धेत कोण जिंकणार यापेक्षा सहभागी होणे हे देखील जिंकण्यासारखेच असल्याचे त्या म्हणाल्या.

यावेळी मनोगत व्यक्त करताना अशोक पडूळ म्हणाले की, तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मैदानी खेळांमुळे शिस्त आणि जिद्द निर्माण होते. जालन्यातील क्रीडा सुविधांचा विकास आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी संघटनांनी अशा आरोग्य व क्रीडा शिबिरांचे सातत्याने आयोजन करावे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### महापौर मगरे यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पारितोषिक

जिल्हास्तरीय तायक्कांदो निवड चाचणी स्पर्धेचा समारोप आणि पारितोषिक वितरण सोहळा महापौर वंदनाताई मगरे व प्रसिद्ध साहित्यिक शेख जाकीर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. या प्रसंगी विजेत्या खेळाडूंना प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिकासह सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके देऊन गौरविण्यात आले. यावेळी बोलताना वंदनाताई मगरे म्हणाल्या की,तायक्कांदो सारख्या क्रीडा प्रकारामुळे मुला-मुलींमध्ये केवळ शारीरिक सुदृढताच येत नाही, तर त्यांच्यात आत्मविश्वास आणि शिस्त निर्माण होते. जालन्यातील मातीतील खेळाडूंमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे, फक्त त्यांना योग्य संधी आणि व्यासपीठाची गरज आहे. आज ज्या खेळाडूंनी पदके पटकावली आहेत, त्यांनी आता राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर जालन्याचा झेंडा फडकवण्यासाठी सज्ज व्हावे. महापालिकेच्या वतीने क्रीडा क्षेत्राला आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही नेहमीच सकारात्मक राहू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. साहित्यिक शेख जाकीर यांनीही खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की, खेळाडूने खेळाडूवृत्ती जोपासली पाहिजे. यश-अपयशाने खचून न जाता सातत्याने सराव करणे हाच प्रगतीचा मार्ग आहे.

---

### जालना मनपा स्विकृत सदस्य निवड

# कॉँग्रेसचा गटनेताच फुटला!

## जिल्हाध्यक्षांचा विक्रीचा खळबळजनक आरोप!



**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक निवडीवरून कॉँग्रेस पक्षाचा अक्षरशः राडा झाला आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला डच्चू देऊन गटनेत्याने थेट दुसऱ्याच्या पारड्यात वजन टाकल्याने संतापलेल्या जिल्हाध्यक्षांनी आपल्याच गटनेत्यावर ''स्वतः ला विकल्याचा'' गंभीर आरोप केला आहे. या प्रकारामुळे जालन्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली असून कॉँग्रेसमधील अंतर्गत यादवी चव्हाट्यावर आली आहे.

कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी गटनेते फारुख तुंडीवाले यांच्यावर तोफ डागली आहे. पक्षाने स्वीकृत सदस्य पदासाठी अब्दुल अजीज यांचे नाव निश्चित केले होते, मात्र गटनेत्याने ऐनवेळी गद्दारी केल्याचा दावा देशमुखांनी केला आहे.

''एखाद्या अशिक्षित माणसाप्रमाणे गटनेत्याचे वर्तन राहिले आहे. काही प्रलोभनांच्या आधारे आणि पैशाच्या देवाणघेवाणीतून गटनेत्याने स्वतःला आणि पक्षाला विकण्याचा प्रयत्न केला आहे. ही अत्यंत लाजीरवाणी स्थिती आहे.'' - **राजाभाऊ देशमुख (जिल्हाध्यक्ष, कॉँग्रेस)**

जिल्हाध्यक्षांच्या आरोपांना गटनेते फारुख तुंडीवाले यांनीही तितक्याच आक्रमकपणे उत्तर दिले आहे. त्यांनी जिल्हाध्यक्षांवरच पलटवार करत गंभीर आरोप केले.

सुपारीचा आरोपः ''जिल्हाध्यक्षांनीच कॉँग्रेस संपवण्याची सुपारी घेतली आहे,'' असा खळबळजनक आरोप तुंडीवाले यांनी केला.

''जिल्हाध्यक्षांचे कोणतेही अधिकृत पत्र माझ्यापर्यंत पोहोचलेच नाही, मग विकण्याचा प्रश्नच येतो कुठे?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

छातीठोक आव्हानः ''आम्ही छातीठोकपणे समोर उभे आहोत. ज्यांनी पैसे घेतले असतील ते घरात लपून बसले आहेत.''

या गद्दारीमुळे संतापलेल्या जिल्हाध्यक्षांनी आता कायदेशीर लढाईची तयारी सुरू केली आहेः नगरसेवक पद रद्द करणारः गटनेत्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी प्रयत्न करणार.

निवडणुकीवर आक्षेपः मनपा आयुक्त आशिमा मित्तल यांची भेट घेऊन या प्रक्रियेवर अधिकृत आक्षेप नोंदवण्यात आला आहे.

जागा रिक्त ठेवण्याची मागणीः गटनेत्याने सादर केलेला अर्ज रद्द करून कॉँग्रेसच्या कोट्यातील जागा रिक्त ठेवण्याची विनंती प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

थोडक्यातः जालन्यात कॉँग्रेस विरुद्ध कॉँग्रेस असा सामना रंगला असून, लोणी कुणी खाल्ले यावरून सुरू झालेला हा वाद आता थेट पद रद्द करण्यापर्यंत पोहोचला आहे. आयुक्तांनी ही प्रक्रिया कायद्यानुसार चालेल असे स्पष्ट केल्यामुळे आता चेंडू प्रशासनाच्या दरबारी आहे.

---

### आमदार खोतकर व नगरसेविका दर्शना झोल खोतकर यांनी साजरी केली ''फुलो की होली''

# जालन्यात पर्यावरणपूरक उत्सवाचा संदेश

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात होळी व धुलीवंदनाच्या निमित्ताने आमदार **अर्जुनराव खोतकर** व नगरसेविका **दर्शना झोल खोतकर** यांनी पारंपारिक पद्धतीने नैसर्गिक फुलांची होळी खेळत नागरिकांना होळी व धुलीवंदनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. रासायनिक रंगांना फाटा देत फुलांच्या पाकळ्यांनी साजरा करण्यात आलेल्या या उत्सवाने सामाजिक एकतेसोबत पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला.

फुलांच्या पाकळ्यांनी एकमेकांना शुभेच्छा देताना द्वेष, मतभेद विसरून प्रेम व सौहार्द वाढवण्याचा संदेश देण्यात आला. *''रंगांपेक्षा नात्यांचे रंग अधिक टिकाऊ असतात'' हा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमात नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी नैसर्गिक फुलांच्या वर्षावात होळीचा आनंद घेतला. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी नागरिकांना पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचे आवाहन केले. नगरसेविका दर्शना झोल खोतकर यांनीही रासायनिक रंगांचा वापर टाळण्याचे व स्वच्छता राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या वेळी सुनिल बापू आर्दड, नगरसेवक संजय डुकरे पाटील, माऊली हरबक, पूजाताई आर्दड तसेच जालना शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

पर्यावरण संवर्धन, सामाजिक एकता आणि पारंपारिक संस्कृती जपत जालन्यात ''फुलो की होली'' उत्साहात साजरी करण्यात आली.



---

### भास्कर दानवे यांनी बंजारा समाजासोबत उत्साहात साजरी केले धुलीवंदन

**जालना-** भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी सावंगी तलाव ता.जालना येथे बंजारा समाजा सोबत धुलीवंदनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. बंजारा समाजाच्या वतीने पारंपारिक पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या आनंदोत्सवात त्यांनी उपस्थित राहून समाजबांधवांसोबत रंगांची उधळण करत सणाचा आनंद लुटला. पारंपारिक वेशभूषा परिधान केलेल्या महिला व युवकांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपारिक वाद्यांच्या निनादात भव्य लोकनृत्य सादर केले. पारंपारिक पोशाखांमुळे संपूर्ण परिसर सणमय झाला होता. भास्कर आबा दानवे यांनी समाजबांधवांसोबत रंगांची उधळण करत सर्वांना धुलीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी सामाजिक ऐक्य, परंपरेचे जतन आणि बंधुभाव यांचे महत्त्व अधोरेखित केले. ''सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणणारे आणि संस्कृती जपणारे माध्यम आहे. बंजारा समाजाची परंपरा आणि एकोप्याची भावना प्रेरणादायी आहे,'' असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी राज्य परिषदेचे सदस्य परसराम तळेकर, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, ग्रामीण तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, चिटणीस हरिभाऊ गोरे तसेच श्री. विजय मोहिते, युवराज राठोड, गोपाल चौधरी, राजू अण्णा जाधव, ज्ञानेश्वर राठोड, कृष्णा गायके, नागेश आंबोरे, पांडुरंग गायकवाड, नारायण मोहिते, लक्ष्मण राठोड, महादेव मोहिते, धनंजय जाधव, दौलत भुतेकर, सनी राठोड, राजाराम राजे जाधव, सखाराम मोहिते, सावळीराम मोहिते, लासीराम राठोड आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

---

### रोहनवाडी येथे समाधान शिबिर व जनजागृती कार्यक्रम उत्साहात

# शासनाच्या सेवा घरपोच व वेळेत मिळाव्यात - तहसीलदार छाया पवार




**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान अंतर्गत रोहनवाडी (ता. जालना) येथे समाधान शिबिर व जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. ग्रामपंचायत रोहनवाडी तसेच जिल्हा परिषद शाळेला अधिकाऱ्यांनी भेट देत नागरिकांशी थेट संवाद साधला.

हा कार्यक्रम जिल्हाधिकारी जालना, अप्पर जिल्हाधिकारी जालना, निवासी उपजिल्हाधिकारी जालना आणि उपविभागीय अधिकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. शिबिरात महसूल विभागाशी संबंधित विविध सेवाउतारा, नोंद दुरुस्ती, वारसा नोंद, फेरफार, जमीन अभिलेख आदींबाबत मार्गदर्शन व अर्ज स्वीकृती करण्यात आली.

यावेळी तहसीलदार छाया पवार यांनी नागरिकांना अभियानाची सविस्तर माहिती देत शासनाच्या सेवा घरपोच व वेळेत मिळाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनीही नागरिकांच्या शंकांचे निरसन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकाभिमुख व न्यायप्रिय प्रशासनाच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन महसूल विभाग नागरिकांच्या दारी सेवा पोहोचवत आहे. आजचा हा समाधान शिबिर उपक्रम म्हणजे केवळ कागदपत्रांची पूर्तता नव्हे, तर लोकांच्या विश्वासाला बळकटी देण्याचा प्रयत्न आहे. जमीन नोंदीतील त्रुटी, वारसा नोंदणी, फेरफार प्रकरणे किंवा इतर महसूलविषयक अडचणीया सर्व बाबींसाठी नागरिकांनी कार्यालयीन फ `ऱ्या मारण्याऐवजी अशा शिबिरांचा लाभ घ्यावा. शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ पात्र व्यक्तींपर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. रोहनवाडीतील ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. पारदर्शकता, तत्परता आणि विश्वास या तीन तत्वांवर महसूल विभाग कार्यरत राहील, याची मी खात्री देते.

नागरिकांच्या अर्जांची तत्काळ स्वीकृती व प्राथमिक तपासणी, महसूल सेवांबाबत मार्गदर्शन पुस्तिकांचे वितरण, जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद, ग्रामपंचायत स्तरावर तक्रार निवारणावर भर आदी या कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये होते. कार्यक्रमास ग्रामस्थ, महिला बचत गट सदस्य, युवक व स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामुळे महसूल कामकाजाबाबत जनजागृती होऊन नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाल्याचे दिसून आले.

---

# दिव्यांग उमेदवारांसाठी विशेष करिअर मार्गदर्शन शिबीराचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील नोकरीच्या शोधात असलेल्या दिव्यांग युवक-युवतींसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयांतर्गत असलेल्या 'नॅशनल करिअर सर्विस सेंटर' (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ६ मार्च २०२६ रोजी विशेष पुनर्वसन व करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी शिवाजी पुतळा परिसरातील गुरुगणेश सभा मंडप, श्रावक संघ तपोधाम येथे हे शिबिर पार पडणार असून जास्तीत जास्त दिव्यांगांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

या शिबिरात सहभागी होणाऱ्या उमेदवारांना केवळ मार्गदर्शनच मिळणार नाही, तर प्रत्यक्ष रोजगाराच्या संधींशी जोडले जाण्यासाठी मदत केली जाणार आहे. उमेदवारांच्या क्षमतेनुसार त्यांना कोणत्या क्षेत्रात करिअर करता येईल, याचे मार्गदर्शन तज्ज्ञांमार्फत केले जाईल. ' २०१६' नुसार पात्र दिव्यांगांना केंद्रातर्फे ओळखपत्र दिले जाईल. तसेच भारत सरकारच्या 'नॅशनल करिअर सर्विस' पोर्टलवर नोंदणी करून दिली जाईल. विविध खासगी कंपन्या आणि उद्योगांमधील संधींची माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. अधिक माहितीसाठी मॉडेल करिअर सेंटर, जालनाचे समन्वयक डॉ. अमोल परिहार (९८२२८५८५७४) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.